**निवडणुक निर्णय अधिकारी, दि अकोला अर्बन को-ऑप.बँक लि., अकोला,**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला यांचे कार्यालय,**
मुख्य कार्यालय, तळ मजला, तोष्णीवाल लेआऊट, दूध डेअरी जवळ, अकोला. - 444 001
संचालक मंडळ निवडणुक कार्यक्रम (2024-2029)

जा.क्र.आक्षेप/01/निवडणूक/2024 दि.30/11/2024

श्री. राहूल चंद्रकांत राठी, उमेदवार, दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला – **आक्षेपकर्ता**

**विरुध्द**

श्री. प्रेमकुमार फागूनमल आनंदानी, उमेदवार, दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला – **उत्तरार्थी**

---

**आदेश**

ज्याअर्थी, श्री. प्रेमकुमार फागूनमल आनंदानी, उमेदवार, दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला यांनी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीमध्ये सर्वसाधारण मतदार संघातून दि.29/11/2024 रोजी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे.

ज्याअर्थी, प्रसिध्द निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे प्राप्त नामनिर्देशनपत्राची छाननी आज दि.30/11/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता सुरु करण्यात आली असता, आक्षेपकर्ता - श्री. राहूल चंद्रकांत राठी, उमेदवार, दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला यांनी श्री. प्रेमकुमार फागूनमल आनंदानी यांचे उमेदवारी अर्जावर लेखी आक्षेप अर्ज दाखल केला. सदर अर्जानुसार ते बँकेच्या ताजनापेठ शाखेमध्ये Recurring Agent (Daily collection agent) म्हणून Commission Basis वर काम करीत आहे. व त्यांनी केलेल्या Collection पोटी बँकेतर्फे त्यांना Commission देण्यात येते. बँकेचे उपविधी क्र.34(A),(b),(d) व इतर तरतुदीप्रमाणे व बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 चे कलम 43 (1),(b) व ,(d) व इतर तरतुदीप्रमाणे बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीकरीता अपात्र आहेत. त्यामुळे त्यांचे नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात यावे असा आक्षेप अर्ज दाखल केला.

सदर आक्षेप अर्जावर बँकेकडून तसेच उत्तरार्थी यांचेकडून त्यांचे लेखी म्हणणे घेण्यात आले. त्यानुसार श्री.प्रेमकुमार फागूनमल आनंदानी यांनी आक्षेप अर्जावर त्यांचे लेखी उत्तर सादर केले की, Recurring Agent हा निवडणूक लढवू शकत नाही असा काही नियम नाही.

तसेच सदर आक्षेप अर्जावर बँकेकडून सादर केलेल्या अभिप्रायाप्रमाणे श्री.प्रेमकुमार फागूनमल आनंदानी हे सन 1991 पासून बँकेचे Recurring Agent म्हणून कार्यरत आहेत. याबाबत बँकेने त्यांचेसोबत करार केलेला आहे. व त्यांना माहे नोव्हेंबर 2024 चे रु.1213/- इतके Commission दिले आहे. तसेच माहे जानेवारी 2024 ते नोव्हेंबर 2024 या कालावधीचे Commission रु.14815/- त्यांचे बचत खात्यामध्ये जमा केले आहे. व त्याबाबतचे Bank Statement सादर केले आहे.

ज्याअर्थी, The Multi State Co-operative Societies Act, 2002 (Amendment) Act 2023 चे कलम 43 मध्ये संचालक मंडळ सदस्यांकरीता अपात्रता नमूद करण्यात आलेली आहे. या कायद्यातील कलम 43(1)(बी), “is concerned or participates in the profits of any contract with the society” व कलम 43(1)(डी), “holds any office or place of profit under the society” अशी तरतुद विषद केली आहे. तसेच अशीच तरतूद बँकेचे उपविधी क्र.34 मध्ये नमूद आहे.

वरील तरतुदींचा विचार करता, पुढील प्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास येते.

1. श्री. प्रेमकुमार फागुनमल आनंदानी यांचा बँकेशी Recurring Agent म्हणून सन 1991 पासून लिखीत स्वरुपात रितसर करार केलेला आहे. व त्यांना बँकेने वेळोवेळी त्याबाबतचा मोबदला म्हणून Commission दिलेले आहे.
2. उक्त तरतुदींनुसार उत्तरार्थी - श्री. प्रेमकुमार फागुनमल आनंदानी बँकेचे संचालक म्हणून पद धारण करण्यास अनर्ह ठरतात.

सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

The Multi State Co-operative Societies Rule, 2002 (Amendment) Rules 2023 चे नियम 19 (G) (2) व नियम 19 (L) (c) नुसार मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार श्री. प्रेमकुमार फागुनमल आनंदानी यांचा सर्वसाधारण मतदार संघातील उमेदवारी अर्ज, The Multi State Co-operative Societies Act, 2002 (Amendment) Act 2023 चे कलम 43 (बी) व (डी) व बँकेचे उपविधी क्र.34 नुसार त्यांनी अनर्हता धारण केलेली असल्यामुळे, त्यांचे नामनिर्देशनपत्र या आदेशाव्दारे नामंजूर करण्यात येत आहे.

सदर आदेश माझ्या सही व शिक्कयानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
दि अकोला अर्बन को.ऑपरेटीव्ह बँक लि.अकोला तथा जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी
सत्यमेव जयते

(विजय पाटील)
**सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी,**
**दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला**
**तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) अकोला**

प्रति

**श्री. प्रेमकुमार फागूनमल आनंदानी,**
उमेदवार, दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला

प्रतिलिपी –

1. Hon. Chairperson, Co-operative election authority, Ministry of Co-operation, Govt. of India, Delhi यांना माहिती करीता सविनय सादर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव
3. श्री. राहूल चंद्रकांत राठी, उमेदवार, दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला यांना माहिती करीता

**सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी,**
**दि अकोला अर्बन को.ऑप बँक लि. अकोला**
**तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) अकोला**